भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०९/२०१७

**१) मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे ११.४५ वा. दर. यातील फिर्यादी ही आपले बाथरुम मध्ये आंघोळीला जात असता आरोपी हा घरा मागील बांधीच्या धुऱ्यावर ऊभा राहुण एकटक पाहात होता फिर्यादी ही आंघोळ करुन बाहेर निघाली तरी आरोपी हा तीला पाहत होता, फिर्यादी ही पुन्हा बाथरुम मध्ये गेली आरोपी हा तीचे मागे जावुन बाथरुमचा दार लोटुन उघडण्याचा प्रयत्न करुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(क) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) घराचे आवारातुन मोटार सायकल व डिक्कीतील नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०६+०७/०९/२०१७ चे रात्र. यातील फिर्यादी आशिष ज्ञानेश्वर वंजारी वय २३ वर्ष, रा. नादोरा टोली याने आपली काळया सिलव्हर रंगाची ग्लॅमर हिरो कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ वाय ३०६१ किंमती ३०,०००/–रु. ही नेहमी प्रमाणे आपले घराचे जिण्या खाली ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल व डिक्कीतील नगदी ६०,०००/–रु. असा एकुण ९०,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जांभुळकर पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) टिप्पर चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकांचा मृत्यु. :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील मृतक मारोती गोमा वरठी वय ४० वर्ष, रा. सातलवाडा हा सायकलने सातलवाडा रोड ते अडयाळ सेव्हन हिल कंपनी रोडने अडयाळ कडे जात असतांना यातील अज्ञात टिप्पर चालकाने आपले ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मृतकचे सायकला धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व टिप्पर घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी प्रभाकर श्रीधर कळपते वय ४२ वर्ष, रा. सातलवाडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४(ब)एमव्ही अॅक्ट मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन मेनरोडवर मध्यभागी ऊभी करुन बेवारस सोडुन गेला ज्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

**५) अज्ञात ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे लोखंडी पोल वाकवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील अज्ञात ट्रक चालकाने आपले ताब्यातील ट्रक हयगयीने चालवुन पिपरा गावातील हनुमान मंदीर जवळील पोल वरील तार तोडुन लोखंडी पोल वाकविल्याने म.रा.वि.वि.कंपनी तुमसर चे अंदाजे १०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी पंकज हरीचंद्र मेश्राम वय ३३ वर्ष, रा. दुर्गा नगर तुमसर सहा. अभियंता म.रा.वि.वि कंपनी तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

## ६) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु  .  :–

दिनांक ०७/०९/२०१७ चे २१.०४ वा. दर यातील मृतक वसंत हरीभाऊ खोटेले वय ५५ वर्ष, रा. खजरी डोंगरगाव जि. गोदिंया हा बस स्थानक साकोली समोरील सर्वीस रोडचे बाजुला प्रकृती बिघडल्याने झोपला असता त्यास अॅम्बुलन्स ने उपचारास उपजिल्हा रुग्नालय साकोली येथे नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टर मेमो वरुन पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

## ७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु .  :–

दिनांक ०७/०९/२०१७ चे १९.४५ वा. दर. यातील मृतक तेजराम भगवान मेश्राम वय ४० वर्ष, रा. देवरी पो. स्टे पालांदुर हा दिनांक ०७/०९/२०१७ चे १९.४५ वा. दर. एआरडीएस रुग्न म्हणुन सा. रु. भंडारा येथे भरती झाला व उपचार सुरु असतांना २३.४२ वा. मरण पावला असतांना डॉ. मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्र पो. स्टे. भंडारा जा. क्र. ५१६२/१७ दिनांक ०८/०९/२०१७ प्रमाणे पो. ना चनाब बं. नं. ११११५ पो.स्टे. पालांदुर याने आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके पो. स्टे. पालांदुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

## ८) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी .  :–

दिनांक ०८/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा, गोबरवाही, जवाहरनगर, वरठी व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून ६९ लिटर हा.भ. दारू+ १०० किलो सडवा+साहित्य किंमती ७१५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती १३९७/–रु. असा एकुण किंमती ८,५४७/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

## ९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०८/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १३४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PS2

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता.
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.